# महाडीबीटी साईट
# विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शक माहिती पुस्तिका

हायर अॅन्ड टेक्नीकल एज्युकेशन या डिपार्टमेंट अंतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता या योजनेसाठी अर्ज.
तसेच स्कॉलरशीप स्कीम फॉर स्टुडन्टस् ऑफ मायनॉरीटी कम्युनिटीज परस्युइंग हायर अॅन्ड प्रोफेशनल एज्युकेशन साठी ऑनलाईनअर्ज

ज्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे ओपन कॅटेगरी मधून प्रवेश घेतलेला आहे व जे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये पदवी (यु.जी.) इंजिनिअरींग व पदव्युत्तर पदवी (पी.जी.) प्रथम, व्दितीय, थेट व्दितीय, तृतीय व चतुर्थ वर्षात प्रवेशीत आहेत अशा सर्व जुन्या व नव्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या https://mahadbt.gov.in या ऑनलाईन साईटवर जाऊन शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी न्यु रजिस्ट्रेशन करुन नव्याने अर्ज भरणे आवश्यक आहे.

**सदर अर्ज ऑनलाईन भरायचे असून त्याची शेवटची तारीख शासनाकडून निश्चितपणे घोषीत करण्यात आलेली नाही. तरीसुध्दा सर्वांनी आपले ऑनलाईन अर्ज लवकरात लवकर साईटवर भरणे आवश्यक आहे. शासनाने अर्ज भरण्याची मुदत नंतर जाहीर केल्यावर अर्ज ऑनलाईन भरुन झालेले नसतील तर त्याची सर्वस्वी जबाबदारी ही विद्यार्थ्यांची राहील व त्यांना त्यांच्या प्रवेशित वर्षानुसार ओपन कॅटेगरी नुसार होणारी सर्व फी ही स्वत: भरणे क्रमप्राप्त राहील. याची सर्व विद्यार्थ्यांनी व पालकांनी नोंद घ्यावी.**

ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आधार कार्ड बाबतचे विविध पर्याय खालील प्रमाणे.

१. ऑनलाईल अर्ज करण्यासाठी आधार कार्ड नंबर असणे आवश्यक आहे. तसेच या आधार नंबर ला आधारच्या ऑनलाईन साईटवर आधार कार्ड काढताना नोंदवलेला मोबाईल नंबर विद्यार्थ्याबरोबर असणे किंवा पालकांचा नंबर दिला असल्यास त्यावर प्राप्त होणारा ओटीपी नंबर त्याला त्वरीत प्राप्त होणे याची आवश्यकता आहे. जर आधार कार्डला जोडलेला नंबर बंद असेल किंवा नंबर बदललेला असेल तर नवीन नंबर त्वरीत आधार संलग्न करणे आवश्यक आहे. याची सोय ई-सेवा केंद्रात उपलब्ध असते याची नोंद घ्यावी.
२. आपल्याकडे आधार कार्ड आहे परंतू मोबाईल नंबर संलग्न केलेला नसल्यास बायोमॅट्रीक चा पर्याय स्वीकारु शकता यासाठी आपण जेथून अर्ज भरत आहात तेथे बायोमॅट्रीक मशीनची सुविधा असणे आवश्यक आहे.
३. आपल्याकडे आधार कार्ड नाही पण ते काढायला दिले आहे तर त्याचा एनरॉलमेंट नंबर वापरुन न्यु रजिस्ट्रेशन करु शकता.
४. आपण अजून आधार कार्ड काढलेलेच नसल्यास ऑनलाईन साईट वर जो शेवटचा पर्याय आहे तो वापरु शकता.

महाराष्ट्र शासनाने महाडीबीटी ही स्कॉलरशीप साठी नव्याने साईट चालू केलेली आहे. या साईट वर अर्ज भरताना काही अडचणी येण्याची शक्यता आहे. अर्ज भरताना माहिती अचूक भरावी. हा अर्ज फायनल सबमिट केल्यावर पुन्हा एडीट होत नाही. म्हणजेच एकदा ऑनलाईन अर्ज submit केल्यावर त्यामध्ये कोणताही बदल होत नाही. त्यामुळे चुकीची माहिती भरली गेल्यास कदाचित संबंधित विद्यार्थी त्या चुकीमुळे शिष्यवृत्तीस पात्र असूनही वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नाईलाजाने विद्यार्थ्याला स्वतःला पूर्ण शुल्क भरावे लागेल. त्यामुळे ऑनलाईन अर्ज submit करण्यापूर्वी आपण भरलेली माहिती अचूक आहे की नाही ते एक-दोनदा तपासून नंतरच submit करण्याची कार्यवाही करावी.

विद्यार्थ्यांनी कोणत्या स्कॉलरशीप स्कीम साठी अर्ज करावेत ते खालील प्रमाणे.

१) ज्यांनी महाराष्ट्र शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे कॅटेगरीतून म्हणजेच SC/ST/VJNTDT/SBC/OBC या प्रवर्गातून प्रवेश घेतलेला आहे अशांनी फक्त महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाचे अंतर्गत विभागातील अर्ज भरावेत.

२) ज्यांनी महाराष्ट्र शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे ओपन कॅटेगरीतून प्रवेश घेतलेला आहे व ज्यांचे उत्पन्न ६ लाखाचे आत आहे अशांनी राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना यामध्ये अर्ज करावेत. जे या योजनेमध्ये अर्ज भरतील तेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता या योजनेला अर्ज करु शकतील. (या योजनेसाठी जे मायनॉरीटी कॅटेगरीतील विद्यार्थी आहेत व जे ओपन कॅटेगरीत प्रवेशीत आहेत ते पण पात्र आहेत त्यांनी योग्य निर्णय घेऊन योग्य तो प्राथम्य क्रम देऊन आपले अर्जाची निश्चिती करावयाची आहे.)

३) ज्यांनी महाराष्ट्र शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे तसेच मॅनेजमेंट कोटा व अगेन्स्ट व्हेकन्सी मधून प्रवेश घेतलेला आहे व जे विद्यार्थी मायनॉरीटी मध्ये येतात उदा. मुस्लीम,बुध्दीस्ट,शीख,पारसी,ख्रिश्चन,ज्युआहेत आणि ज्यांचे कुटुंबाचे एकूण वार्षीक उत्पन्न ६ लाखाचे आत आहे असे विद्यार्थी स्कॉलरशीप स्कीम फॉर स्टुडन्टस ऑफ मायनॉरीटी कम्युनिटीज परस्युइंग हायर अॅन्ड प्रोफेशनल एज्युकेशनया योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करु शकतात.

अत्यंत महत्त्वाचे : अर्ज भरण्यासाठी खालील सर्व कागदपत्रे ओरीजीनल स्कॅन करुन पीडीएफ फाईलमध्ये २५० केबी पेक्षा लहान साईज असलेली असणे आवश्यक आहे. (फक्त आणि फक्त **पीडीएफच** असावीत बाकी इतर फॉरमॅटमधील नसावीत. इतर फॉरमॅटमधील फाईल, कॉलेज ऑनलाईन अर्ज चेक करत असताना नीट वाचता येत नाहीत यास्तव फक्त पीडीएफच असावीत. तसेच ती स्कॅनर वरुन स्कॅन केलेली असावीत. मोबाईल, कॅमेरा वापरुन पीडीएफ केलेली नसावीत, याची काळजी घ्यावी. तसेच ही एकदाच अपलोड करायची असून सारखी सारखी लागणार नाहीत. म्हणून ती चांगली असावीत.)

**विशेष माहिती – पीडीएफ फाईल बनवणे किंवा बनवलेली फाईल साईज कमी करणे, दोन सेम ची मार्कशिट तसेच गॅप सर्टीफीकेट एकत्र करणे यासाठी https://en.pdf24.org/या फ्रीवेअर सॉफ्टवेअर चा वापर करावा. तसेच फाईल साईज कमी करताना त्याचे डीपी साईज १०० व क्वॉलीटी लो क्वॉलीटी करुन फाईल साईज कमी करावा.)**

**..3.**

**प्रत्येक कॅटेगरीनुसार व कोर्स नुसार आवश्यक असणारी कागदपत्रे खालील प्रमाणे**
**(सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती योजनांसाठी ७५ टक्के हजेरी असणे आवश्यक आहे.)**

१) रेशन कार्ड

२) १० वी चे मार्कशिट

३) १२ वी चे मार्कशिट

४) कॉलेजचे बोनाफाईड सर्टीफीकेट (मायनॉरीटी व डॉ. पंजाबराव होस्टेल मेन. योजने साठी)

५) लिव्हींग/ट्रान्सफर सर्टीफीकेट (या कॉलेज मध्ये प्रवेश घेण्याआधीच्या कॉलेजचे)

६) डीप्लोमा ची सर्व सेम/इयर ची मार्कशिट व सर्टीफीकेट.

७) ग्रॅज्युएशन ची सर्व सेम/इयर ची मार्कशिट व सर्टीफीकेट.

८) या कॉलेजची प्रथम,व्दितीय,तृतीय,चतुर्थ वर्षांची मार्कशिट (लेजर चालणार नाही.)

९) डोमिसाईल सर्टीफीकेट (महाराष्ट्र राज्याचे कंम्पलसरी आहे. याला दुसरा कोणताही पर्याय नाही.)

१०) उत्पन्नाचा दाखला (फक्त तहसीलदारांनी दिलेला ग्राह्य धरण्यात येईल. बाकी कोणतेही दाखले चालणार नाहीत.)


११) गॅप सर्टीफिकेट (तहसीलदार कार्यालयामधून रजिस्टर केलेले)

१२) बॅंक पासबूक फोटोकॉपी

१३) चालू वर्षी फी भरल्याची पावती.

१४) मागील वर्षी या योजनेचा लाभ घेतला असल्याचे आधीच्या कॉलेजचे पत्र. घेतला नसल्यास तसे न घेतल्याचे पत्र कॉलेजचे पत्र आवश्यक. यामध्ये कॉलेजच्या सर्व वर्षांचा उल्लेख असावा. (ही सुचना जे या योजनेसाठी नव्याने या कॉलेजमध्ये पहील्यांदा अर्ज करत आहेत त्यांच्यासाठी) फक्त रा.छ.शा.म.शि.शु.शि. साठी.

या ईथे I/We agree ला टीक करुन submit हे बटण प्रेस करायचे आहे. परंतू I/We agree ला टीक न करता व submit हे बटण प्रेस न करता save as draft करुन सर्व अर्ज व त्यातील माहीती व फाईल अपलोड करुन ठेवाव्यात. <u>ज्या वेळी पूढील सुचना दिली जाईल तेव्हा सर्वांनी I/We agree ला टीक करुन submit हे बटण प्रेस करुन अर्ज फायनल करायचा आहे. कारण एकदा submit केलेला अर्ज नंतर एडीट होत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.</u>





सर्व प्रथम https://mahadbt.gov.in/DBT/#/ही साईट ओपन करा.

त्यानंतर रेड बॉक्स मध्ये दाखवल्याप्रमाणे भाषा English करुन घ्या.

त्यानंतर रेड बॉक्स मध्ये दाखवल्याप्रमाणे New Registration ला क्लीक करा.




त्यानंतर खालील प्रमाणे विंडो ओपन होईल.
त्यानंतर रेड बॉक्स मध्ये दाखवल्याप्रमाणे do you have aadhar? ला Yes ला टीक करा.
त्यानंतर रेड बॉक्स मध्ये दाखवल्याप्रमाणे Continue हे बटण प्रेस करा.






त्यानंतर खालील प्रमाणे विंडो ओपन होईल.
त्यानंतर रेड बॉक्स मध्ये दाखवल्याप्रमाणे OTP ला क्लीक करा.
त्यानंतर रेड बॉक्स मध्ये दाखवल्याप्रमाणे By clicking the tick boxला टीक करा.
त्यानंतर विद्यार्थ्याने स्वत:चा आधार नंबर टाकून Send OTP ला क्लीक करा.



त्यानंतर खालील तीन विंडो ओपन होतील व त्यावर खालील मेसेज आपल्याला दिसतील त्यातील ओके बटणाला क्लीक करा.



त्यानंतर खालील प्रमाणे विंडो ओपन होईल. त्यामध्ये तुमच्या आधार नंबरला लींक असलेल्या मोबाईल नंबर वर ओटीपी प्राप्त होईल तो नंबर बॉक्स मध्ये टाईप करा व व्हेरीफाय ओटीपीला क्लीक करा. व पुढे continue बटणाला क्लीक करा.





त्यानंतर खालील प्रमाणे विंडो ओपन होईल. त्यातील Personal Details,Permanent Address Details,Bank Details या प्रत्येक निळ्या रंगाच्या पट्टीवर क्लीक केल्यावर त्यातील माहिती ड्रॉप डाऊन होऊन आपल्याला दिसेल ती माहिती तपासून घ्या. ही माहिती आधार कार्ड काढताना जी दिलेली आहे ती तपासून घ्यावी यामध्ये फक्त ई-मेल आपल्याला नव्याने भरता येतो तो विद्यार्थ्याने चेक करावा किंवा नवीन भरावा. बाकीची कोणतीही माहिती आपल्याला एडीट करता येत नाही. ही गोष्ट लक्षात घ्यावी.


त्यानंतर Continue हे बटण प्रेस करा. बॅंक डीटेल्स मध्ये जी बॅंक आहे त्याचेच पासबूक ची झेरॉक्स दयावी.



त्यानंतर खालील प्रमाणे विंडो ओपन होईल. याबाबत आपल्याला सुचना आहे की पुढील प्रमाणेच युझर नेम तयार करावे. युझर नेम – आपले आडनाव प्रथम (xyz) व नंतर आपले नांव (abc) उदा. xyzabc पासवर्ड – पासवर्ड आपल्या आवडी प्रमाणे ठेवावा पण तो कायम स्वरुपी लक्षात राहील असा असावा. नंतर रजीस्टर बटण प्रेस करावे. येथे आपली रजिस्ट्रेशन ची प्रक्रिया पूर्ण होईल.





त्यानंतर खालीलप्रमाणे विंडो ओपन होईल व आपले रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्याचा मेसेज दाखवेल.




Registration process ok

त्यानंतर पुन्हा https://mahadbt.gov.in/DBT/#/ ही साईट ओपन करा. किंवा रजिस्टेशन पूर्ण झाल्यावर होम बटण क्लीक करुन होम स्क्रीन ला जावे. त्यानंतर खालील प्रमाणे विंडो ओपन होईल.
यामध्ये Log In ला जाऊन Resident/Applicant हा ऑप्शन सीलेक्ट करावा व आपले युझर नेम व पासवर्ड वापरुन लॉगीन करावे. लॉगीन केल्यावर खालील प्रमाणे विंडो ओपन होईल. त्यामध्ये ॲप्लाय स्कीम ला क्लीक करा नंतर डीपार्टमेंट ला क्लीक करा नंतर हायर ॲन्ड टेक्नीकल एज्युकेशन या डीपार्टमेंट ला क्लीक करा. यामध्ये राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृत निर्वाह भत्ता या योजना अशा दोन वेगवेगळया स्कीम दिसतील. त्यातील कोणत्या स्कीम ला कोणी ॲप्लाय करायचे ते खालील प्रमाणे.






ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे मागील वर्षाचे कुटुंबाचे एकत्रीत उत्पन्न खालील प्रमाणे असेल तर.
मागील वर्षाचे उत्पन्न म्हणजे काय? - जे विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ वर्षामध्ये या कॉलेजमध्ये १,२,३,४ या पैकी कोणत्याही वर्षाला शिकत असतील तर त्यांना २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी वडीलांचे नावाने तहसीलदारांनी दिलेला उत्पनाचा दाखला आवश्यक आहे. उत्पनाची मर्यादा रु.६.०० लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न आहे.

जे विद्यार्थी डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृत निर्वाह भत्ता या योजने साठी अर्ज भरणार आहेत त्यांनी राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज भरलेला असला पाहीजे. तेसेच त्याचे कडे त्याच्या पालकांचा (वडीलांचा) अल्प भूधारक किंवा नोंदणीकृत मजूर असल्याचा दाखला असला पाहीजे. व तो होस्टेलमध्ये रहाणारा असला पाहीजे. हे होस्टेल सरकारी किंवा खासगी असेल तरी चालेल.

उत्पन्नाचा दाखला हा तहसीलदारांनीच वडीलांचे नावे दिलेला असला पाहीजे. वडील हयात (मृत) नसल्यास आईचे नावाने दाखला व वडीलांचा मृत्यु दाखला आवश्यक आहे. बाकीचे बाबतीत उदा. डीव्होर्स, डीव्होर्स झालेला नाही पण आई वडील वेगळे रहात असल्यास, आई-वडील दोघेही हयात नसल्यास, वडील अचानक हरवले असल्यास, अशांनी कृपया कॉलेजच्या स्कॉलरशीप सेक्शन मध्ये प्रत्यक्ष येऊन भेटावे. तसेच **१६ नंबर चा फॉर्म, एम्प्लॉयर ने दिलेला उत्पन्नाचा दाखला ग्राह्य धरला जाणार नाही.**

मायनॉरीटीचे अर्ज भरणाऱ्यांनी स्कॉलरशीप सेक्शन मध्ये ऑफीस वेळेत येऊन भेटावे.




त्यानंतर खालील प्रमाणे विंडो ओपन होईल यामध्ये Personal Details, Income Details, Personal Eligibility Details, Caste Details, Permanent AddressDetails, Parent's/Guardian's Details या मेनू वर क्लीक करुन यातील सर्व माहिती भरायची आहे. आवश्यक ठिकाणी पीडीएफ फाईल अपलोड करायची आहे.

Is it a renewal application?* ◯ Yes ◉ No- या प्रश्नाला ज्यांनी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये कॉलेजमध्ये पहील्यांदा नव्याने प्रवेश घेतलेला आहे अशांनी No ऑप्शन सीलेक्ट करायचा आहे.

बाकीच्यांनी Yes ऑप्शन सीलेक्ट करायचा आहे. रीन्युअल करणाऱ्यांसाठी मागील वर्षाचा स्कॉलरशीप क्रमांक म्हणजेच आयडी विचारला जाईल तो आयडी आपल्या कॉलेजकडून घ्यावा.

दरवेळी सेव्ह ॲड ड्राफ्ट हा ऑप्शन आधी सीलेक्ट करुन मगच सेव्ह ॲन्ड नेक्स्ट करावे जेणेकरुन तुमची पहिली भरलेली माहिती जेवढी भरलेली आहे ती सेव्ह राहील.

Personal Eligibility Detailsमध्ये आपला child number विचारला आहे. म्हणजे आपल्या कुटुंबात जी फक्त तुमची भावंडे आहेत त्यामध्ये तुमचा कीतवा नंबर आहे तो तीथे भरायचा आहे. यामध्ये लग्न झालेले भाऊ बहीण यांना पण त्यामध्ये समावीष्ट करायचे आहे. आता ते वेगळे रहात असले तरी. तसेच आपले भावंडांपैकी कोणी मृत झाले असल्यास त्यांना गृहित धरुन मगच आपला त्यामध्ये कीतवा नंबर आहे ते भरायचे आहे.



त्यानंतर कोर्स ॲप्लाइड मध्ये कोर्स डीटेल्स असा मेनू आहे. त्यामध्ये जी माहिती आहे ती भरावी. यामध्ये महत्त्वाचे म्हणजे आपल्या कॉलेजचे नाव ज्या ग्रॅंड टाईप मध्ये आहे. त्याप्रमाणे साईटवरील dropdwon box madhun अचूक select करावे. ग्रॅंड टाईपमध्ये Government, Granted, Non Granted प्रमाणे ज्या टाईपच्या कॉलेज मध्ये असेल ते select करावे.


एडमिशन इयर मध्ये आपण या कॉलेज मध्ये पहील्यांदा जेव्हा नव्याने प्रवेश घेतला ते वर्ष भरावे.

करंट ॲकेडमीक इयर मध्ये आपण कोणत्या वर्षात यंदाच्या शैक्षणिक वर्षात सध्या शिकत आहात तो नंबर सीलेक्ट करायचा आहे. म्हणजेच 1,2,3,4 इयर या पैकी आपल्याला जे लागू आहे ते भरायचे आहे.

जे डीप्लोमा करुन डायरेक्ट सेंकड इयर मध्ये प्रवेशीत आहेत त्यांनी सध्या १ले इयर म्हणजे २ रे वर्ष, २रे इयर म्हणजे ३ रे वर्ष, ३रे इयर मृहणजे ४ थे वर्ष असे गृहीत धरुन अर्ज भरावेत यात नंतर बदल होण्याची शक्यता आहे. याची नोंद घ्यावी.

ॲडमिशन डेट मध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये ज्या दिवशी आपण कॉलेजची फी भरुन प्रवेश घेतलेला आहे त्या पावतीवर जी तारीख आहे ती तारीख ऑनलाईन अर्जात भरावी.

Is Diploma Passed?* Yes No येथे फक्त ज्यांनी डीप्लोमा नंतर डायरेक्ट सेकंड इयरला प्रवेश घेतलेला आहे अशांनीच Yes सीलेक्ट करावे आणि ज्यांनी HSC/Degree नंतर प्रथम वर्षात प्रवेश घेतलेला आहे त्यांनी No सीलेक्ट करावे.



एज्युकेशनल डिटेल्स मध्ये १२ वी चे Marks Obtained* मध्ये मार्क भरल्यावर व्हॅलिडेट करुन पहावे जर झाले नाही तर Total Marks*मध्ये आऊट ऑफ मार्क भरावेत म्हणजेच किती पैकी ते भरावे. उदा.650

पदव्युत्तर पदवी करणाऱ्यांनी १०वी, १२वी व ग्रॅज्युएशन चे मार्क भरावेत.


Upload Transfer Certificate म्हणजेच Leaving certificate ते अपलोड करावे. जे आपल्याला शेवटच्या शैक्षणिक संस्थेकडून मिळालेले असेल ते.

गॅप सर्टीफीकेट – जर चालू शैक्षणिक वर्षाआधी म्हणजेच १७-१८ च्या आधी १६-१७ मध्ये शैक्षणिक खंड असल्यास गॅप बाबत प्रश्नाला Yes सीलेक्ट करुन गॅप ॲफीडेव्हीट अपलोड करावे अन्यथा No सीलेक्ट करावे.

Beneficiary Category यामध्ये होस्टेल ला रहात असल्यास त्याबाबत माहिती भरावी व होस्टेल मालकाचे सर्टीफीकेट अपलोड करावे. (या सर्टीफीकेट मध्ये रहाण्याचे व मेसचे रक्कमेचा उल्लेख असायला हवा व ते होस्टेलच्या नावे असलेल्या लेटर हेड वर रेव्हीन्यु स्टॅंप लाऊन होस्टेल मालकाने सही केलेले असले पाहीजे.)

आपण जर गव्हर्मेंट च्या होस्टेल मध्ये रहात असाल तर Govt. होस्टेल असा ऑप्शन सिलेक्ट करावा नसल्यास Non Govt. असे सिलेक्ट करावे.

आपण जर होस्टेलला रहातच नसल्यास day scholar सीलेक्ट करावे.



एज्युकेशन डिटेल्स मध्ये जे विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये २,३,४ वर्षामध्ये शिकत आहेत त्यांना आपल्या मागील वर्षाचे शैक्षणिक डिटेल्स भरावे लागणार आहेत. यामध्ये १२वी किंवा डीप्लोमा व त्यानंतर आपल्या कॉलेज मध्ये आपण जी वर्ष पास झाला आहात त्याची डीटेल्स भरायची आहेत.

यामध्ये १२वी किंवा डीप्लोमा व त्यानंतर आपल्या कॉलेज मध्ये आपण १,२,३ या वर्षाची माहीती भरल्यानंतर प्रत्येक वर्षाच्या शेवटी खालील प्रमाणे एक प्रश्न येत आहे.

Was there any gap in previous qualification/previous course year?* ○ Yes ○ No

याचा अर्थ असा आहे की १२ वी चे आधी डीप्लोमाचे आधी व आपल्या कॉलेज मध्ये शिकत असताना १ल्या,२ऱ्या व ३ऱ्या वर्षाआधी आपल्याला शैक्षणिक कालखंडात drop होता काय ? असा आहे. असल्यास त्यानुसार पर्याय निवडावा व गॅप सर्टीफीकेटची स्कॅन कॉपी अपलोड करावी.

रीझल्ट व मार्क्स ऑब्टेन मध्ये जे पूर्ण पास आहेत त्यांनी त्यांच्या दोन्ही सेम चे पॉइंटर नुसार मार्कशीट चे मागील बाजूस असलेल्या डीटेल्स नुसार आपली टक्केवारी काढावी व ॲव्हरेज करुन लिहावी.

जे एटीकेटी लागून पास झाले आहेत त्यांनी सर्वांनी ४० टक्के मार्क भरुन ठेवावेत. (याबाबत काही बदल होण्याची शक्यता आहे. तो नंतर कळवण्यात येईल)

-----------


# पान नंबर 2 वरील अत्यंत महत्वाचे ही सुचना आधी वाचावी.

# त्यामुळे खालील माहिती फक्त वाचून ठेवावी त्या प्रमाणे कृती करु नये.

सर्वात शेवटी submission हा ऑप्शन येईल. इथे I / we agree ला टीक केल्यावर Submit हे बटण प्रेस केल्यावर आपला ऑनलाईन भरलेला अर्ज सेव्ह होईल व त्याबाबतचा आपल्याला मेसेज स्क्रीन वर दिसेल व त्यामध्ये ॲप्लीकेशन नंबर येईल तो काळजीपूर्वक नोंदऊन घ्यावा.

यासाठी Submit बटणावर कुलीक करण्याआधी अर्ज पुन्हा नीट तपासून पहावा. कारण एकदा अर्ज submit झाल्यावर तो पुन्हा edit करता येत नाही. यास्तव विशेष काळजी घेऊन अर्ज भरावा व कोणतीही चूक होणार नाही याची काळजी घ्यावी.




धन्यवाद ...!